

# संत जोसमारिया एस्क्रिवा
## ओपुस देई चे संस्थापक
## प्रार्थना

*हे देवा, पवित्र कुमारी मरियेच्या मध्यस्थीने तु आपले धर्मगुरू संत जोसमारिया ह्यांच्यावर अगणित कृपादानांचा वर्षाव केला आहेस. 'ओपुस देई' ची स्थापना करण्यासाठी तु त्यांची आपला निष्ठावंत सेवक म्हणून निवड केलीस. दैनांदिन कामकाजात पाविन्य पाळणे व ख्रिस्ती माणसाची सर्वसामान्य कर्तव्ये पार पाडणे म्हणजेच ओपुस देई आहे. हे देवा, माझ्या जीवनात येणारे सर्व प्रसंग व घटना म्हणजे तुझ्यावर प्रेम करण्यासाठी, ख्रिस्तसभा, पोप व सर्व संतमहात्म्यांची संपूर्ण तनमनाने सेवा करण्यासाठी जणू संधी आहे ही भावना माझ्या मनात निर्माण कर आणि श्रध्दा व प्रेमाद्धारे ह्या पृथ्वीतलावरील सर्व मार्ग उजळण्यास मला शक्ती दे.*

*संत जोसमारियाच्या मध्यस्थीने माझी ही विनंती (आपली विनंती सांगावी) तु मान्य कर. आमेन.*

*आमच्या बापा, नमो मारिया, पिता पुत्र व पवित्र आत्मा ह्यांस गौरव असो...*

*जिथे कुठे तुमच्या मनाचा ओढा असेल, तुमचे कामकाज किंव्हा ज्या गोष्टींवर तुमचा जीव जडला असेल अशा सर्व ठिकाणी तुम्हाला प्रभु येशू ख्रिस्त अगदी दररोज भेटू शकतो. ह्या जगातील भौतिक गोष्टींच्या वेढयात अडकलेले असतानाही आपण परमेश्वर व त्याच्या लोकांची सेवा ह्याद्धारे स्वतःला परिशुद्ध करुन घेतले पाहीजे. माझ्या प्रिय मुला–मुलींनो, क्षितिजावर जणू स्वर्ग–पृथ्वीचे मिलन होत आहे. परंतु आपण आपल्या दररोजच्या जीवनाला पाविन्र्याचा उजाळा देतो तेव्हांच खरोखर आपल्या ह्रदयात स्वर्ग–पृथ्वीचे मिलन होत असते.*

*–संत जोसमारिया एस्क्रिवा ह्याचें प्रवचन*
*विश्वावर संपूर्ण ह्रदयाने प्रेम, ८.१०.१९६७.*

संत जोसमारिया एस्क्रिवा ह्ंयाचा जन्म ९ जानेवरी १९०२ रोजी स्पेनतधील बार्बास्टो येथे झाला. २८ मार्च १९२५ रोजी त्यांना सारागोसा यथे गुरुदीक्षा देण्यात आली. २ ऑक्टोबर १९२८ रोजी दैवी प्रेरणेने त्यांनी ओपुस देई ची स्थापना केली. २६ जून १९७५ ह्या दिवशी रोममधील आपल्या खोलीत काम करीत असताना पवित्र मरियेच्या तसबिरीकडे त्यांनी प्रेमभराने अखेरचा कटाश्र टाकल्यानंतर अचानक त्यांचे निधन झाले. तोपर्यंत ओपुस देई चा जगाच्या पाचही खंडात कार्यविस्तार झालेला होता. आज ८० देशांमध्ये त्यांचे ६०,००० सद्स्य कार्यरत आहेत. संत जोसमारियाच्या प्रमानेच ते पोप व बिशपांशी तादाम्य साधून ख्रिस्तसभेची मनोभावे सेवा करीत आहेत. ६ ऑक्टोबर २००२ रोजी पोप जॅान पॅाल दूसरे ह्ंयानी फा.जोसमारियांना संत. पदाचा बहुमान बहाल केला. प्रतिवर्षी २६ जुनला त्यांचा सण साजरा केला जातो. रोममधील शांती मातेच्या चर्चमध्ये (Prelatic Church of Our Lady of Peace,Viale Bruno Buozzi 75, Rome) संत जोसमारियांचे पार्थिव षरीर दफन करण्यात आले आहे.

संत जोसिमारियाच्या बद्ल अधिक माहितीसाठीरू
www.josemariaescriva.info www.escrivaworks.org

संत जोसिमारियाच्या मध्यस्थीने ज्यांचे हेतु पूर्ण झाले आहेत त्यांनी Opus Dei Prelature, P.O. Box - 4559, New Delhi – 110016 ह्या पत्यावर कळवावे.

ख्रिस्तसभेच्या संमतिने प्रकाशित